ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – VI April 2014

# ग्रामीण साहित्यातील वास्तव

प्रा. डॉ. सुनील म. पवार,
ज. ए. इ. चे महिला महाविद्यालय,
स. वा. जोशी विद्यासंकुल,
डोंबिवली (पूर्व) – 421201.

ग्रामीण समाजासारखा एखादा समाज जेव्हा नव्यानेच लेखनाभिमुख होतो तेव्हा त्या समाजातील लेखकांच्या मनात स्वसमाजाच्या संदर्भातील जाणिवांनाच स्वाभाविकपणे अग्रस्थान प्राप्त होते. त्यांच्या भावभावनांची बंदिशी (Structure of feeling) यामुळे ग्रामीण जीवनाभिमुख खरे होते.

विशिष्ट साहित्य 'ग्रामीण' आहे किंवा नाही हे ठरविताना त्यातून प्रकट होणारी स्पंदने कोणत्या प्रकारची आहेत, त्यात ग्रामीणतेच्या अनुषंगाने उद्‌भवणाऱ्या संवेदनांना कितपत स्थान आहे हे पहावयास हवे. विशिष्ट खेड्यात राहतो की शहरात, हे या संदर्भात अप्रस्तुत ठरते. लेखकाच्या बाह्यपरिविषांपेक्षा त्याची संज्ञा ग्रामीण परीघ, वातावरण, संस्कार यांनी कितपत प्रचलित झाली आहे, ती भोवतालच्या सृष्टीकडे कोणत्या अनुसंघाने पाहतो, हे विचारात घ्यावे लागते आणि हे असे विचारात घेणे म्हणजेच साहित्यातील ग्रामीण वास्तव शोधणे.

ग्रामीण साहित्य हे मुखतः खेड्यात इतस्ततः पसरलेल्या अर्धशिक्षित–अशिक्षित समाजाशी निगडीत आहे. नवसाहित्याला आधुनिक संस्कृतीची झझन विज्ञानाची जशी पार्श्वभूमी लाभलेली आहे तशी ग्रामीण साहित्याला लाभलेली नाही. अद्यापि ते नवशिकेपणातून बाहेर पडलेले नाहीत. समकालीन जीवनाचा ओघ ग्रामीण आणि अद्‌अनुषंगाच्या प्रतिक्रिया एक स्वरुपाच्या नाहीत. ग्रामीण साहित्यात ठाण मांडून बसलेल्या या विशिष्ट वास्तवतेमागे प्रतिक्रियेचाही एक भाग नांदतो.

आधुनिक मराठी साहित्याच्या पूर्वकालात ग्रामीण जीवनाची बहुतांशी उपेक्षाच झाली. स्वप्नरंजनाप्रमाणे मराठीत जी ग्रामीणता वावरली ती मनोरंजनाचा एक आकर्षक घटक म्हणून मराठी लेखकांच्या दृष्टीने, वास्तवचित्रण हे केवळ प्रत्यक्षातील घटितांचे दर्शक्ष हे समीकरण वाढीस लागले. ग्रामीण साहित्याने मग वास्तववादाची हीच नस पकडली. कोणताही लेखक वास्तवाकडे जेव्हा पाहतो, तेव्हा त्याच्या 'पाहण्यावर' त्याच्या प्रकृतीचे तत्कालीन सांस्कृतिक वातावरणाचे, चित्रणगत आशयाचे, स्वीकृत माध्यमाचे ठसे उमटल्याशिवाय राहत नाहीत.

कवितेपेक्षा गद्य हे वास्तवचित्रणाचे उपयुक्त माध्यम. ग्रामीण साहित्यात परंतु कवितेचा अभावच आहे. कवितेप्रमाणे नाटकेही येथे अभावानेच आढळतात. व्यापक वास्तव दर्शनाच्या दृष्टीने कथेपेक्षाही कादंबरी हा प्रकार अधिक उपकारक पण तुलनेने ग्रामीण साहित्य कादंबरीपेक्षा कथा लेखनच अधिक विपुल प्रमाणात आढळते.

दारिद्र्याच्या आणि अज्ञानाच्या पोटी दडलेले अर्थ आणि अनर्थ, त्यातून उद्भवणाऱ्या अनेक वेदना आणि निग्रह यांना समर्थपणे अद्यापि कोणी हाताळलेला नाही. दुसरे असे की, आजच्या ग्रामीण साहित्यातील ग्रामीण जीवनाचे दर्शन आजचे वाटण्यापेक्षा कालचेच वाटते अनेक प्रकारची उलाघाल आज होत आहे. या स्थित्यंतराचा, औद्योगिकरणाचा, शहरी संपर्काचा, ग्रामजीवनावर होणारा मूलभूत परिणाम, खेड्याच्या आसपास प्रस्थापित होऊ लागली. कारखानदारीतून उद्भवणारे ताण, जुन्या–नव्या कुटुंब व्यवस्थेची रसमिसळ, नवे राजकीय, पुढारीपण, नव्या ग्रामसंस्था असे आणखी कितीतरी आज ग्रामीण लेखकांच्या स्पर्शासाठी आसुसलेले आहे. या साऱ्याच्या विविध पातळ्या हेरणे, कल्पनेच्या सहाय्याने त्याचे नव नवे आकार कोरणहे हे आजच्या ग्रामीण लेखकाचे एकप्रकारचे कर्तव्यत ठरते. ग्रामीण साहित्यातील वास्तवतेचे चित्रण ग्रामीण लेखकासमोर व आस्वादकांसमोर सुस्पष्टपणे मांडले गेलेच पाहिजे.

**ग्रामीण म्हणजे काय?**

ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य असे थोडक्यात म्हणता येईल. आजही आपल्या देशातील 80 टक्के जनता खेड्या–पाड्यांमधून राहते. तेव्हा या ग्रामीण भागांतून सर्वदूर पसरलेल्या समजाची स्वतःची अषी एक संस्कृती निर्माण झाल्याचे दिसते.

भारतातील खेड्याची रचना, समाजव्यवस्था बघितली तर त्या समाजव्यवस्थेची स्वतःची अशी एक स्वतंत्र व स्वयंपूर्ण रचना आपल्याला दिसते. ग्राम संस्कृतीची बाह्य रचना ही जशी परंपरेने चाल आलेली होती त्याचप्रमाणे तिची एक आंर्तरचनाही होती. ग्रामसंस्कृतीतील माणूस हा ग्रामसंस्कृतीषी पक्का बांधला गेला तो याच आंर्तरचनेमुळे.

ग्रामीण संस्कृती ही प्रामुख्याने प्राचीन काळापासून कृषिकेंद्रित संस्कृती होती. शेती केंद्रस्थानी असल्यामुळे ग्राममजीवनातील विविध घटक आणि विविध स्तर परस्परपूरक अशाच भूमिका वठवित.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – VI April 2014

ग्रामीण जीवनामध्ये शेती, शेतीशी निकडीत पाऊस, शेतीशी निगडीत कालचक्र, शेतीषी निगडीत जनावरे आणि अशाच सर्व घटकांचा समावेश आपण कुटुंब संस्कृतीत करतो त्यामुळेच या सर्व घटकांभोवती ग्रामीण माणसाचे स्वतंत्र असे भावविश्व निर्माण होताना दिसते. ही संबंध संस्कृती शेतीशी निकडीत असल्यामुळे, स्वाभाविकपणेच ती निसर्गसन्मुख असणार हे उघड आहे.

एकीकडे गावगाड्यात बोलले जाणे आणि दुसरीकडे निसर्गावर अवलंबून राहणे यातून ग्रामीण माणसाचे मन आदिमतेकडे झुकते. ही आदिमता नागरी माणसाला नीटशी कळत नाही म्हणून की काय, रुढ मराठी समीक्षा 'ग्रामीण माणूस' म्हणजे अज्ञानी, रुढी–परंपरा जपणारा असे समीकरण घालून याचे चित्रण जेथे येते ते ग्रामीण साहित्य अशी करते. ग्रामीण साहित्य हे एका विशिष्ट संस्कृतीचे अपत्य असते म्हणून त्याच्या मनात लोकभ्रमांना, लोकरुढींना, लोकविधींना, लोकसमजुतींना अतिशय महत्वाचे स्थान असते. म्हणजेच ग्राम संस्कृती निसर्गसन्मुख असल्याने आदिम मनोव्यवस्थेकडे झुकलेली असते. भूतकाळातच येथील वर्तमान गोठलेला असतो.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1. मराठी साहित्य संज्ञा/समीक्षा कोश : संपा विजया राजाध्यक्ष
2. ग्रागीण साहित्य विशेषांक : डॉ. आनंद यादव
3. ग्रामीण कादंबरी : डॉ. रविंद्र ठाकूर
4. ग्रामीण साहित्य स्वरुप आणि शोध : डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
5. मराठी कथेची स्थितीगती : डॉ. अंजली सोमण
6. संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश : संपा.प्रभा गणोरकर, वसंत आबाजी डहाके
7. ग्रामीण कथाः स्वरुप आणि विकास : वासुदेव गुलाटे
8. ग्रामीण साहित्य : एक चिंतन : द.ता. भोसले
9. ग्रामीण साहित्य आणि वास्तव : डॉ. आनंद यादव